ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 11 | ISSUE - 5 | JANUARY - 2025

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# न्यायमूर्ती म. गो. रानडे यांचे कृषीविषयक विचार व कार्य.



श्री. एस. वाय. यमगर
सहा. प्राध्यापक
क्रांतिअग्रणी डॉ.जी.डी.बापू लाड महाविद्यालय, कुंडल .
ता.पलूस जि. सांगली.

**प्रस्तावना –**

1875 ते 1901 या 25 वर्षाच्या भागातील कालखंडास योग्य असं जर नाव द्यायचे असेल तर रानडे युग असं म्हणावं लागेल्या कालखंडात केवळ महाराष्ट्राच्या नव्हे तर संपूर्ण भारताच्या सार्वजनिक जीवनावर रानडे यांचा फार मोठा प्रभाव दिसून येतो. या कालखंडात भारतभर सक्रिय असलेल्या सामाजिक, धार्मिक, आर्थिक आणि राजकीय चळवळींना एक सुरात बांधून राष्ट्रीय पातळीवर त्यांचा प्रयोग करणारे जी कोणती एक शक्ती होती तिचे नाव होते न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे

न्यायमूर्ती रानडे खऱ्या अर्थाने मानवतेची पुजारी होते त्यांच्यासाठी संपूर्ण मानव जातीला परिपूर्ण प्रवृत्त आणि आधुनिक करणे हाच त्यांच्या उत्थान कार्याचा उद्देश होता न्यायमूर्ती रानडे यांनी दुष्काळाच्या अनुषंगाने व स्वतंत्रपणे शेतीविषयक सभेच्या मासिकात लेख लिहून ते स्वतःची मते मांडत असत त्यांनी त्या कालखंडात शेतीच्या प्रश्नाविषयी सरकारकडे निवेदन पाठवले होते.

न्यायमूर्ती रानडे यांना महाराष्ट्रात प्रचलित असलेली रयतवारी पद्धत मान्य होती. 1880 साली त्यांनी म्हटले होते की रयतवारी पद्धत कायम करून उत्पादित होणाऱ्या धान्यांपैकी किती भाग साऱ्यांच्या रूपाने द्यावयाचा हे कायम ठरवून टाकावे. शेतीच्या प्रश्नावर हा एक उपाय आहे, शिवाय कायमधारा व सावकारी पद्धत यांना पायबंद धान्य हा शेती सुधारण्याचा उपाय आहे असे रानडे यांचे मत होते

डोईजड शेतसाऱ्यामुळे शेतकऱ्यांचे चांगल्या दिवसात धान्य शिल्लक राहते ते अगोदरच्या वर्गातील काळजीपोटी नाहीशी होते शेतीच्या सुधारण्यासाठी त्यांच्या हाती भांडवल हवे तेच राहत नाही असे त्यांचे विचार होते दुष्काळ आला की शेतकऱ्यांची अधिक तारांबळ उडते वारंवार जमिनीचा सारा बदलत गेल्यामुळे अनिश्चितता राहते बचत करून शेतीच्या सुधारणा करण्यासाठी उत्तेजक वातावरण निर्माण होत नाही.

न्यायमूर्ती रानडे यांनी 1881 साली लिहिले होते की, शेतकऱ्यांना जमीनदारांच्या जोखंडातून सुटका हवी आहे जमिनीचा सारा अतिरिक्त आहे हे रानडे यांचे मत होते रानडे यांनी बंगालमधील शेतीविषयक जी कायदे केले गेले ते किती योग्य व अयोग्य आहेत याची पडताळणी केली.

शेतीत शौर्य आणि सुधारणा आवश्यक असते असे त्यांचे मत होते यासाठी लहान व मोठे शेतकरी वर्ग व त्यांचे जीवन यावेळी न्यायमूर्ती रानडे यांनी आपल्या लेखातून प्रकाश पाडला आहे मोठ्या प्रमाणावर शेती करणारे त्या काळात दहा एक हजार शेतकरी देशात आवश्यक आहेत असे त्यांचे म्हणणे होते ग्रामीण भागात शेतकऱ्यांना शेतीत पुरेसा फायदा झाला तर त्यांच्या जीवनात स्थिरता येईल व त्यांची प्रगती होईल असे त्यांना वाटत होते लहान शेतकरी व त्यांच्या कर्जबाजारीपणा यांची जाणारी सतत चिंता होती शेतकरी जगला तर देश जगेल असे त्यांना नेहमी वाटत असेल त्यांनी आपल्या लेखात शेतकऱ्यांची कर्ज हा विषय विस्तारित चर्चेला आणलेला आहे

शेतीत मोठ्या प्रमाणात भांडवल गुंतले पाहिजे हे सांगताना बँकेकडे पैसा कसा पडून आहे हे आकडेवारीनिशी एका लेखात त्यांनी दाखवून दिले आहे. त्यानंतर सरकार सहकारी पतपेढ्या रूपाने व अन्य रीतीने कशी मदत करू शकेल यांचे त्यांनी दिग्दर्शनही केले

ग्रामीण कर्ज पुरवठ्याच्या बाबतीत हंगेरी,ऑस्ट्रेलिया, इटली, फ्रान्स, बेल्जियम व स्वित्झर्लंड या देशात 50 वर्षात काय अवस्था झाली याची माहिती रानडे यांनी आपले लेखाद्वारे दिली आहे. त्यांनी आपल्या लेखात असे म्हटले आहे की सरकारी तत्त्व प्रथम जमिनीत अवलंबण्यात आले व स्वित्झर्लंड मध्ये ते अधिक विकसित होत गेले हा दाखला देऊन भारतात केवळ शेतकऱ्यांसाठीच नव्हे तर लोहार, कुंभार, चांभार अशा अनेक व्यावसायिकांकडे काही शिल्लक राहणी शक्य नसल्याने त्यांनाही सहकारी कर्जाची सोय करून देणे आवश्यक आहे. तसेच सरकारला ज्यादा भार पडणार नाही असे सांगताना रानडे यांनी पोस्ट खाते बँका इतरांकडील पैशांचा वापर करावा व गोरगरीब शेतकरी कारागीर यांना मदत करावी अशी सूचना केली होती यावरून त्यांची केवढी दृष्टी होते याची कल्पना आपणास येते शेतीची सुधारणा हा व्यापक व आर्थिक सुधारण्याचा भाग आहे असे रानडे यांची धारणा होती.

न्यायमूर्ती रानडे यांनी नॅश नावाच्या गृहस्थाला बरोबर घेऊन हिंदुस्थानातील वाढते दुष्काळ व त्यांची कारणे यांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला. हिंदुस्तान व महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी न्यायमूर्ती रानडे यांनी दुष्काळ व टंचाईच्या काळात प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष अशा अनेक योजना व मदत करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. यावरून न्यायमूर्ती रानडे यांना गोरगरीब शेतकरी व जमीनदार यांच्या विषयीची तळमळ दिसून येते.

रानडे यांनी दुष्काळाच्या वेळी दक्षिणेतील दंग्यांच्या वेळी केलेले कार्य लक्षात घेऊन त्यांचे वर्णन 'A man of classes and not of Musses ' असे एका काँग्रेसच्या पुढाऱ्याने म्हटले आहे.

## सारांश –

न्यायमूर्ती रानडे हे जरी सरकारी नोकरीत असले न्यायमूर्ती असले तरी त्यांनी त्यांची भांडवल न करता सार्वजनिक सभेच्या माध्यमातून केलेले कार्य शेतकरी गोरगरीब यांच्यासाठी केलेली मदत व दुष्काळात व दक्षिणेकडील दंग्यात बजावलेली महत्त्वाची भूमिका यावरून महाराष्ट्रातील एक थोर व्यक्तिमत्व होते हे आपणास समजून येते यावरून हिंदुस्थानच्या इतिहासात ऊ शिक्षित शहरी पुढाऱ्यात ग्रामीण भागातील जनतेच्या हाल अपेष्टा लक्ष्यात घेऊन, त्यासाठी चळवळ सुरू करणारे रानडे बहुदा पहिलेच होते, हेही विसरता कामा नये.

## संदर्भ ग्रंथ –

1. न. र.फाटक न्या. म.गो.रानडे चरित्र पृ.121
2. श. द. जावडेकर आधुनिक भारत पृ. 144
3. बाळ गंगाधर टिळक कै. न्या. महादेवराव गोविंद रानडे लोकमान्य टिळकांचे केसरीतील लेख खंड चौथा पृ. 283 ते 286
4. रानडे व्यक्ती कार्य आणि कर्तुत्व डॉ.प. कृ. टोपे पान नंबर 134 ते 142.